# प्रकरण - चार

## मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

# प्रकरण - ४ थे

## मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकांचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण

४•१ प्रस्तावना

४•२ "बालभारती" इयत्ता ५ वी मराठीच्या पाठयपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण

४•३ "बालभारती" इयत्ता ६ वी मराठीच्या पाठयपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण

४•४ "बालभारती" इयत्ता ७ वी मराठीच्या पाठयपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण

४•५ समारोप

=0=0=0=0=0=

# प्रकरण - ४ थे

## मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण

### ४·१ प्रस्तावना :

प्रस्तुत शोध प्रबंधाचा विषय " उच्च प्राथमिक स्तरावरील मराठी (प्रथमस्तर) पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्य शिक्षणाच्या संदर्भात चिकित्सात्मक अभ्यास " असा असल्यामुळे , या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकातून कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात याचा शोध घेणे अत्यावश्यक वाटल्याने प्रस्तुतप्रकरणाचा समावेश करण्यात आलेला आहे· पाठ्यपुस्तकातून शोधून काढलेल्या मूल्यांच्या पार्श्वभूमीवर ही मूल्ये किती प्रमाणात मुलांमध्ये संक्रमित होतात, त्याचा पडताळा घेणे सोपे जाईल असा विश्वास वाटतो·

महाराष्ट्रामध्ये बहुतांश शाळेतील वा शाळेबाहेरील सर्व शिक्षण प्रामुख्याने मातृभाषेतून होत असते· मातृभाषा हे आत्माविष्कार, परस्पर व्यवहार व ऐक्य आणि सामाजिक स्थैर्य राखणारे परिणामकारक व व्यापक असे साधन आहे· मातृभाषेच्या अध्ययनाद्वारे विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व विस्तारत जावे, त्यांना विविध कल्पना, भावना व विचार ह्यांचे ज्ञान व्हावे व त्याद्वारा ज्ञान, सौंदर्य यांची ओळख व्हावी· त्यांच्या जीवनात चिकित्सक दृष्टी, आत्मविश्वास, प्रेम, शुचिता, संयम व विवेक जागे व्हावेत· सामाजिक बांधिलकी, देशप्रेम व राष्ट्रीय ऐक्य ह्यांचा आविष्कार त्यांच्या वर्तनातून व्हावा· जीवन सुसंस्कृत

व संपन्न करण्याची प्रेरणा मातृभाषेच्या अध्ययनातून मिळावी ही दृष्टी ठेवून मातृभाषेच्या अभ्यासाची उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.[१]

प्रस्तुत प्रकरणामध्ये पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांनी तयार केलेल्या " बालभारती मराठी पुस्तक पाचवे ते सातवे " या पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून कोणकोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रत्येक पाठाचा आशय, त्यांची उद्दिष्टे व त्या द्वारे कोणते संस्कार विद्यार्थ्यांवर होवू शकतील याचा विचार करूनच प्रत्येक पाठातील मूल्ये निश्चित केलेली आहेत. ही मूल्ये निश्चिती करतांना पाठातून प्रभावीपणे जाणवणा-या मूल्यांनाच प्रमुख मूल्य मानले आहे व त्या प्रमुख मूल्याबरोबरच दुसरी कांही मूल्ये प्रतिबिंबित होत असतील तर अशाही मूल्यांचा विचार केलेला आहे.

पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचा विचार करतांना प्रथम प्रत्येक पाठातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये निर्धारित करून त्यानंतर त्या त्या पाठाचे नाव व त्यापुढे ती मूल्ये नमूद केली आहेत, त्यानंतर कांही पाठांमध्ये समान मूल्ये आढळल्यामुळे मूल्यानुसार त्या पाठांचे परत एकदा वर्गीकरण केले. उदाहरणार्थ "धाडस" हे मूल्य " शूरबाला " ," मौजेचे पोहणे ", " फेकला तटाहून घोडा ", " कन्याकुमारी ", " हुतात्मा भाई कोतवाल " या पाच पाठातून आढळून येते. त्यामुळे मूल्यांच्या दृष्टिकोनातून हे पाठ एकाच वर्गात नमूद केले आहेत.

इयत्ता ५ वी च्या मराठी बालभारतीच्या क्रमिकपुस्तकाच्या शेवटी कवितेनंतर तीन गाणी स्वतंत्र दिली आहेत. या गाण्यांचा उद्देश मूल्य संक्रमण नसून विद्यार्थ्यांचे मनोरंजन व्हावे, रसास्वाद घेता यावा, तालासुराचे ज्ञान व्हावे हाच आहे. त्यामुळे मूल्य संक्रमणामध्ये या तीन गीतांचा विचार शोध प्रबंधामध्ये केलेला नाही.

संशोधकाने या पाठ्यपुस्तकांचा सूक्ष्म अभ्यास करून तसेच ही पाठ्यपुस्तके शिकविणा-या कांही अध्यापकांशी चर्चा करून प्रत्येक पाठामधून कोणती मूल्ये प्रतिबिंबीत होतात त्यांची पाठनिहाय यादी केली. त्यानंतर प्रश्नावली बरोबरच ही पाठनिहाय मूल्यांची यादी इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गांना मराठी शिकविणा-या शिक्षकांना देण्यात आली आणि त्या त्या पाठासमोर नमूद केलेल्या मूल्याखेरीज आणखी कांही मूल्ये आढळून येत असल्यास त्या त्या पाठासमोर त्यांची नोंद करण्यास सांगितले.

**We are building civilization not a building or a factory. Civilization depends not upon material equipments or political machinery, but upon the human character, So, the major task of our education is improvement of character.**[2]

मूल्य संक्रमण हा चारित्र्य बांधणीचा पाया ठरतो. संस्कृतीच्या बांधणीसाठी चारित्र्यसंवर्धनाची डॉ. राधाकृष्णन यांनी अपेक्षिलेली गरज आणि त्या संदर्भातील " शिक्षण " एक साधन म्हणून शिक्षणाची भूमिका विचारात घेतली म्हणजे, ज्या पाठ्यपुस्तकांच्या

आधारे विद्यार्थ्यांना शिक्षण द्यायचे त्या पुस्तकाच्या निर्मितीकडे, निर्मितीच्या उद्दिष्टांकडे, निर्मिती प्रक्रियेकडे आणि अपेक्षिलेली उद्दिष्टे सिद्धीस गेलीत की नाहीत या मूल्यमापनात्मक बाबींकडे आपल्याला लक्ष द्यावे लागते.

निसर्गातील मानवी प्राण्याचे वैशिष्ट हे आहे की, तो विचार करतो. सुज्ञ होण्यासाठी अव्याहतपणे धडपडतो. आधुनिक युगातील त्या त्या देशातील शैक्षणिक आयोगाचे अवलोकन केले असता सुज्ञतेकडे जाणारा मानवाचा प्रवास अवलोकिता येतो. मूल्यसंवर्धनाला वेगवेगळ्या शैक्षणिक आयोगामध्ये मूलभूत महत्व दिलेले आपल्याला पहावयास मिळते.

विद्यापीठ शिक्षण आयोगाने मूल्य शिक्षण संदर्भात पुढील विचार व्यक्ती केलेले आहेत. " सामाजिक जीवनाची नैतिक व आध्यात्मिक पातळी उंचावणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे."[३] माध्यमिक शिक्षण आयोगाने ( १९५२-५३ ) शिक्षणाद्वारे चारित्र्य विकास, बौद्धिकक्षमता संपादन आणि सामाजिक न्यायाकरिता तळमळ निर्माण व्हावी असे म्हणून मूल्यविकासाच्या संदर्भात आपल्या प्रतिवृत्तामध्ये मुदलियार आयोग म्हणतो,

" One of the dominant aims of the school will be to educate the character and inculcate the right kinds of ideas and values in the students. Schools should be earnestly intere ted in moral and social training."[4]

श्री प्रकाश कमिटीने देखील मूल्यांच्या संदर्भात अपेक्षा केलेली आहे.

" It is essential that from the earliest childhood moral values should be inculcated in us. If the content of education in enriched with moral and spiritual values, the purpose of education will be truly served."[5]

कोठारी शिक्षण आयोगाने " शिक्षण आणि राष्ट्र विकास,१९६६" तर शिक्षणातून राष्ट्र विकास साधत असताना राष्ट्रीय उद्दिष्टांमध्ये नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या शिक्षणाला स्थान दिलेले आहे.[६]

नैतिक सामाजिक मूल्यांची आवश्यकता विविध शिक्षण आयोगांनी आणि मंडळांनी मांडताना कोणती नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांना शिकवावीत याबद्दल सूचना केलेल्या आहेत. या सर्वांचे परिशिष्ट " एन.सी.ई.आर.टी." ने करून 'Documents on social, moral and spiritual values in education"(1979) या पुस्तिकेमध्ये ८४ मूल्यांची यादी दिलेली आहे.[७]

महाराष्ट्रामध्ये, औरंगाबाद येथे नैतिक शिक्षणाचा विचार करण्यासाठी राज्यस्तरीय चर्चासत्र ऑगस्ट,१९८१ मध्ये घेण्यात आलेले आहे या चर्चासत्रामध्ये देखील ११ नैतिक मूल्यांचा शालेय अभ्यासक्रमासाठी स्वीकार केला आहे.

जून, १९८१ मध्ये दिल्ली येथे झालेल्या सेंट्रल अॅडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या बैठकीमध्ये " सहनशीलता, सह अस्तित्व आणि सामंजस्य" ही मूल्ये विद्यार्थ्यांवर बिंबविली जावीत अशा शिक्षण पध्दतीची मागणी केली.

प्रस्तुत प्रकरणामध्ये मूल्यांच्या दृष्टीकोनातून पाठयपुस्तकांचे विश्लेषण करताना प्रत्येक इयत्तेचा स्वतंत्रपणे विचार केलेला असून प्रत्येक इयत्ता स्वतंत्र विभाग कल्पिलेला आहे.

## ४.२ "बालभारती" इयत्ता ५ वी मराठीच्या पाठयपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण :

इयत्ता ५ वी च्या मराठी बालभारतीच्या पाठयपुस्तकांमध्ये २२ गद्य पाठ व ८ पद्य पाठ आहेत. असे एकूण ३० पाठ आहेत. संशोधकाने प्रत्येक पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये शोधून काढलेली आहेत. ती खालील सारणीमध्ये दिलेली आहेत.

### सारणी क्रमांक - ४.१

इयत्ता ५ वी च्या बालभारती पाठयपुस्तकातील पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १. | सुंदर हिरवे माळ(पद्य) | निसर्ग प्रेम, सहानुभूति सेवाभाव, |

सारणी क्र•४•१ ... पुढे चालू ...

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| २• | हिशेब | सेवाभाव, साधनशुचित्व, काटकसरवृत्ती |
| ३• | शूरबाला | धाडस, दया, प्रामाणिकपणा |
| ४• | माझ्या पाठच्या बहिणी (पद्य) | भगिनी प्रेम, ममता |
| ५• | गोटया | सहानुभूति, दया, भगिनीप्रेम, प्रामाणिकपणा |
| ६• | मौजेचे पोहोणे | निसर्ग प्रेम, धाडस, |
| ७• | आईस पत्र | स्वावलंबन, कर्तव्यनिष्ठा, सहिष्णुता, संयम |
| ८• | जिद्द हीच दौलत | जिद्द, श्रमप्रतिष्ठा, देशप्रेम, |
| ९• | दादू | प्रामाणिकपणा, निस्पृहता |
| १०• | विज्ञानयुगाची नांदी(पद्य) | विज्ञाननिष्ठा |
| ११• | मित्रप्रेम | आदर, मित्रप्रेम |
| १२• | मुलांचे शिक्षण | काटकसर, त्याग, तपश्चर्या |
| १३• | अन्योक्ती (पद्य) | विवेक, परोपकार |

सारणी क्र.४.१ .... पुढे चालू ...

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठामधून प्रतिबिंबित होणारीमूल्ये |
|---|---|---|
| १४. | भामरागड | सहानुभूती, सेवाभाव, बंधुप्रेम, श्रमप्रतिष्ठा, श्रद्धाळू, करुणा, निष्ठा, कृतज्ञता, साहस |
| १५. | माझे गाणे | विनोदीवृत्ती |
| १६. | फेकला तटाहून घोडा (पद्य) | शौर्य, वात्सल्य, राष्ट्रप्रेम |
| १७. | आमची राणी | धाडस, परोपकार, जिव्हाळा |
| १८. | अरण्य - प्रकाश | भूतदया, एकात्मता, दया, आदर |
| १९. | हे दणकट माझे बाहू (पद्य) | धाडस, कर्तव्यनिष्ठा, त्याग स्वाभिमान |
| २०. | राधिका | आदरातिथ्य, शिस्त, सचोटी, वैज्ञानिक दृष्टीकोन |
| २१. | रंगाची किमया | सौंदर्यदृष्टी |
| २२. | हसवी पहाट घरोघरी (पद्य) | एकात्मता, सर्वोदय |
| २३. | पाटीची करामत | जिद्द, कष्टाळू, आदर, सहानुभुति |
| २४. | ऋतुचक्र | निसर्गप्रेम, सौंदर्यदृष्टी |

सारणी क्र.४.१ .... पुढे चालू ...

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठामधून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
| --- | --- | --- |
| २५. | झपझप चाललेत नाजूक पाय (पद्य) | ममता, सहानुभूति, कर्तव्यनिष्ठा |
| २६. | कन्याकुमारी | निसर्गप्रेम, धाडस, सर्वोदय, परोपकार, चिंतनशीलता. |
| २७. | जबाबदारी | शिष्टाचार, सभ्यता, वक्तशीरपणा, संयम, शिस्त, दानत, राष्ट्रीय चरित्र्य, जबाबदारी, विश्वसनियता. |
| २८. | नवरोजी | कृतज्ञता, आदर, सौहार्द, सन्मान, एकात्मता. |
| २९. | हुतात्मा भाई कोतवाल | देशप्रेम, धाडस, सहकार्य |
| ३०. | विचारधन | सहानुभूति, त्याग, सेवा, सामाजिक बांधिलकी, निःस्वार्थ, सहिष्णुता, मानवता, सेवाभाव, श्रमप्रतिष्ठा |

वरील सारणी क्रमांक ४.१ नुसार पाठामधून मूल्ये प्रतिबिंबित होतात. या मूल्यांचे निरीक्षण केले असता कांही पाठामधून कांही समान मूल्ये आढळतात. त्यावरून मूल्यानुसार पाठांची रचना खालील सारणी क्रमांक ४.२ मध्ये केलेली आहे.

सारणी क्रमांक - ४•२

मूल्यावर आधारित केलेले पाठांचे वर्गीकरण

| अ•नं• | मूल्याचे नांव | मूल्यानी प्रतिबिंबित असणारे पाठ |
|---|---|---|
| १• | सहानुभूति | सुंदर हिरवे माळ (पद्य), माझ्या पाठच्या बहिणी (पद्य), आईस पत्र, भामरागड, आमची राणी, हसावी पहाट घरोघरी(पद्य), पाटीची करामत, झपझप चाललेत नाजूक पाय (पद्य), विचारधन |
| २• | सेवाभाव | शूरबाला, गोटया, मुलींचे शिक्षण, भामरागड, आमची राणी, हुतात्मा भाई कोतवाल, विचारधन• |
| ३• | धाडस | शूरबाला, मौजेचे पोहोणे, भामरागड, फेकला तटाहुन घोडा (पद्य), आमची राणी, कन्याकुमारी, हुतात्माभाई कोतवाल• |
| ४• | निसर्ग प्रेम | सुंदर हिरवे माळ,(पद्य), मौजेचे पोहोणे, अरण्य-प्रकाश, ऋतुचक्र, हुतात्माभाई कोतवाल |
| ५• | बंधुप्रेम | माझ्या पाठच्या बहिणी(पद्य), गोटया, भामरागड, झपझप चाललेत नाजूक पाय(पद्य), नवरोजी |

सारणी क्रमांक ४•२ •••• पुढे चालू •••

| अ•नं• | मूल्यांचे नाव | मूल्यांनी प्रतिबिंबित असणारे पाठ |
|---|---|---|
| ६• | मनाची एकाग्रता | हिशेब, मौजेचे पोहोणे, जिद्द हीच दौलत, मुलींचे शिक्षण, जबाबदारी |
| ७• | राष्ट्रप्रेम | जिद्द हीच दौलत, फेकला तटाहून घोडा(पद्य), कन्याकुमारी, हुतात्माभाई कोतवाल, विचारधन |
| ८• | आदर | मित्रप्रेम, अरण्य प्रकाश, राधिका, पाटीची करामत, नवरोजी• |
| ९• | सामाजिक बांधिलकी | भामरागड, हसावी पहाट घरोघरी (पद्य) जबाबदारी, नवरोजी, विचारधन• |
| १०• | ममता | माझ्या पाठच्या बहिणी (पद्य) , दादू,आमची राणी, झपझप चाललेत नाजूक पाय(पद्य) |
| ११• | सहिष्णुता | आईस पत्र, भामरागड, नवरोजी, विचारधन |
| १२• | त्याग | मुलींचे शिक्षण, हे दणकट माझे बाहु (पद्य), हुतात्मा भाई कोतवाल, विचारधन |
| १३• | प्रामाणिकपणा | शूरबाला, गोटया, दादू |
| १४• | सौंदर्यदृष्टी | सुंदर हिरवे माळ(पद्य), रंगाची किमया, ऋतुचक्र |
| १५• | दया | शूरबाला, गोटया, अरण्य-प्रकाश |

सारणी क्रमांक ४·२ ... पुढे चालू ...

| अ·नं· | मूल्यांचे नाव | मूल्यानी प्रतिबिंबित असणारे पाठ |
|---|---|---|
| १६· | स्वाभिमान | फेकला तटाहुन घोडा (पद्य), आमची राणी हे दणकट माझे बाहु (पद्य) |
| १७· | एकात्मता | अरण्य-प्रकाश, हसावी पहाट घरोघरी( पद्य), नवरोजी· |
| १८· | भारताचा सामाईक वारसा | मित्रप्रेम, कन्याकुमारी, विचारधन |
| १९· | प्रयत्नवादी | दाद, माझे गाणे, फेकला तटाहुन घोडा(पद्य) |
| २०· | मानवता | दाद, आमची राणी, विचारधन |
| २१· | परोपकार | अन्योक्ती (पद्य), आमची राणी, कन्याकुमारी |
| २२· | स्पष्टवक्तेपणा | हिशेब, आमची राणी· |
| २३· | अभिमान | गोटया, रंगाची किमया |
| २४· | स्वावलंबन | आईस पत्र, पाटीची करामत |
| २५· | सचोटी | शूरबाला, राधिका |
| २६· | काटकसर | हिशेब, मुलींचे शिक्षण |
| २७· | जिद्द | जिद्द हीच दौलत, हसावी पहाट घरोघरी(पद्य) |
| २८· | निःस्पृहता | दाद, हुतात्माभाई कोतवाल |
| २९· | निःस्वार्थ | अन्योक्ती (पद्य), विचारधन |

सारणी क्रमांक ४•२ •••• पुढे चालू •••

| अ•नं• | मूल्यांचे नाव | मूल्यानी प्रतिबिंबित व असणारे पाठ |
|---|---|---|
| १०• | वैज्ञानिक दृष्टिकोन | विज्ञानाची नांदी (पद्य), राधिका |
| ११• | अंधश्रद्धा निर्मुलन | विज्ञानाची नांदी (पद्य), भामरागड |
| १२• | शिस्त | राधिका, जबाबदारी |

वरील प्रमाणे मूल्यानुसार पाठांची विभागणी केलेली आहे• सर्व पाठांच्या चिकित्सक पाहणीवरून असे आढळून आले की, कांही समान मूल्ये समान पाठामधून आढळून येतात• यामध्ये सहानुभूति, सेवाभाव, धाडस, निसर्ग प्रेम, बंधुप्रेम, मनाची एकाग्रता, राष्ट्रप्रेम, आदर, ममता, सामाजिक बांधिलकी या मूल्यांच्या संक्रमणासाठी अधिक प्रमाणात पाठ दिसून आले•

तसेच सहिष्णुता, त्याग, प्रामाणिकपणा, दया, सौंदर्यदृष्टी, स्वाभिमान, एकात्मता या गुणांच्या वाढीसाठी आईस पत्र, भामरागड, नवरोजी, मुलांचे शिक्षण, गोटया , शूरबाला, दादू हे दणकट माझे बहु, हुतात्माभाई कोतवाल , सुंदर हिरवे माळ, रंगाची किमया, ऋतुचक्र, अरण्य-प्रकाश, पेबला तटाहुन घोडा, आमची राणी, हलावी पहाट घरो-घरी , विचारधन इत्यादी पाठांची योजना केलेली आहे•

वरील विवेचनावरून असे आढळून येते की, " सहानुभूति " हे मूल्य नऊ पाठामधून प्रतिबिंबित झाले आहे, "सेवाभाव" व "धाडस" ही मूल्ये अनुक्रमे सात व सात पाठामधून प्रतिबिंबित होतात• निसर्ग प्रेम,

बंधुप्रेम, मनाची एकाग्रता, राष्ट्रप्रेम, आदर, सामाजिक बांधिलकी, ही मूल्ये प्रत्येकी पाच पाठातून प्रतिबिंबित होतात. असे आढळून येते.

४.३ "बालभारती" इयत्ता ३ री मराठीच्या पाठ्यपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण :

इयत्ता ३ री च्या बालभारती मराठीच्या पाठ्यपुस्तकामध्ये एकूण ३४ पाठ आहेत. यापैकी २१ पाठ गद्य स्वरूपाचे तर १३ पाठ पद्याचे आहेत. या ३४ पाठाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण केले आहे. प्रत्येक पाठातून कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात याचा शोध घेतला. त्या मुल्याचे पुढीलप्रमाणे सारणी स्वरूपात वर्गीकरण केलेले आहे.

सारणी क्रमांक ४.३

इयत्ता ३ री च्या बालभारती पाठ्यपुस्तकातील पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | पाठातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| | गद्य विभाग | |
| १. | साने गुरूजी | सहानुभूति, सेवा, श्रमप्रतिष्ठा, सौंदर्यदृष्टी, देशप्रेम, वात्सल्य, जिव्हाळा. राष्ट्रीय एकात्मता, वैज्ञानिक दृष्टीकोन. |
| २. | अंगणातील पाहुणे | सौंदर्यदृष्टी, भूतदया |

सारणी क्रमांक ४·१ ···· पुढे चालू ···

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| ३· | ढेकणोबा | हजरजबाबी, तत्परता |
| ४· | भास्कर राय | शिष्टाचार, विनयशील, सहकार्य, शौर्य, धाडस, देशप्रेम, कर्तव्यनिष्ठा |
| ५· | अप्पा पटवर्धन एक सेवाभावी जीवन | सेवा, देशप्रेम, सहानुभूति, समता, कर्तव्यनिष्ठा, सत्याग्रह, श्रमप्रतिष्ठा· |
| ६· | मोहीम फत्ते | धाडस, वैज्ञानिक दृष्टीकोन, सहकार्य |
| ७· | महापूर | सहानुभूति, सहकार्य |
| ८· | उभाजन्म लोकसेवेला-वाहीन | सेवाभाव, सामाजिक बांधिलकी |
| ९· | बहिणीची माया | जिव्हाळा, धाडस, सहानुभूति, कर्तव्यनिष्ठा |
| १०· | जत्रा | श्रध्दा, धाडस |
| ११· | अब्दुलमिया | जिव्हाळा, वात्सल्य, सहानुभूति |
| १२· | माझा विरंगुळा | वात्सल्य, रसिकता, |
| १३· | सहकार महर्षि विखे·पाटील | परोपकार, सहानुभूति, उदारवृत्ती, आदर सहकार्य, श्रमप्रतिष्ठा |
| १४· | आम्ही बांगाली शिकलो | आदर, श्रमप्रतिष्ठा |
| १५· | आबा | कष्टाळूवृत्ती, संयम, चिकाटी, काटकसर साधेपणा, श्रमप्रतिष्ठा |

सारणी क्रमांक ४.१ .... पुढे चालू ...

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | पाठातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १६. | अण्णा - एक दीपगृह | मानवता, सहानुभूति, शेजारधर्म, आत्मविश्वास, समता, स्वावलंबन, परोपकार, आदर. |
| १७. | मैफल | रसिकता |
| १८. | मोटार पहावी घेऊन | विवेक |
| १९. | गांधीजींच्या शब्दात गोखले | जिव्हाळा, परोपकार, स्वच्छता, नियमीतपणा, सत्य, सामाजिक बांधिलकी, देशप्रेम, विश्वास आदर |
| २०. | सर्व धर्मांची शिकवण | सर्व धर्मसमभाव, सत्य, प्रेम, करुणा |
| २१. | विचारधन | |
| | दादाभाई नौरोजी | निश्चयी, देशप्रेम, सामाजिक बांधिलकी, |
| | विठ्ठल रामजी शिंदे | राष्ट्रीय एकात्मता, समता, विनयशीलता, नम्रता, शिस्त |
| | आचार्य दादा धर्माधिकारी | सत्संग, सद्भिरुची |
| | नरहर कुरुंदकर | अभिमान, शिष्टाचार |
| | पद्य विभाग : | |
| १. | नव्या जगाचे नायक आम्ही | विज्ञान निष्ठा |
| २. | आनंदी पक्षी | सौंदर्यदृष्टी, आनंदीवृत्ती |

सारणी क्रमांक ४•१ .... पुढे चालू ...

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
| --- | --- | --- |
| ३• | सागर | सौंदर्यदृष्टी, चातुर्य, निसर्गप्रेम |
| ४• | समाधी | कृतज्ञता, आदर |
| ५• | मानवांनो आता यारे | सहानुभुति, मानवता, विश्वऐक्याची भावना |
| ६• | रानातली अंगाई | सौंदर्यदृष्टी, वात्सल्य |
| ७• | मो-याची बल्लारी | भूतदया, वात्सल्य |
| ८• | माणूस माझे नाव | विज्ञाननिष्ठा, समता, साहस |
| ९• | ढुबे लालसर | सौंदर्यदृष्टी, निसर्गप्रेम |
| १०• | जन्मभूमी | देशप्रेम, सौंदर्यदृष्टी |
| ११• | अखंड | सत्य, बंधुभाव, समता, उद्योग प्रियता, ममता |
| १२• | सत्पुरुष लक्षणे | धैर्य, सहिष्णुता, शौर्य |
| १३• | संतवाणी | भूतदया, समता, आदर, जिव्हाळा, नम्रता सहानुभूति• |

वरील सारणी क्रमांक ४•१ नुसार प्रत्येक पाठांमधून मूल्ये प्रतिबिंबित होतात असे आढळून आले• बहुतेक सर्व पाठातून एकापेक्षा अधिक मूल्ये प्रतिबिंबित झालेली आढळून येतात• तसेच एक मूल्य अनेक पाठा मधून प्रतिबिंबित झालेले आढळून येते• यासाठी समान मूल्ये कोणकोणत्या पाठामधून प्रतिबिंबित होतात• यावरून मूल्यानुसार पाठांची नावे पुढील

प्रमाणे दिलेली आहेत•

सारणी क्रमांक ४•४

**मूल्यावर आधारित केलेले पाठांचे वर्गीकरण**

| अ•नं• | मूल्याचे नाव | मूल्यानी प्रतिबिंबित असणारे पाठ |
|---|---|---|
| १• | आदर | उभाजन्म लोकसेवेला वाहीन, सहकार महर्षि विखे- पाटील, आम्ही अंगाली शिकलो, अण्णा- एक दीपगृह, गांधीजींच्या शब्दात- गोखले, विचारधन, समाधी, मानवानो आता या रे, संतवाणी |
| २• | सहानुभुति | सानेगुरूजी, अप्पा पटवर्धन एक सेवाभावी जीवन महापूर, बहिणीची माया, सहकार महर्षि विखे•पाटील, अण्णा एक दिपगृह, मानवानो आता या रे, संतवाणी• |
| ३• | सौंदर्यदृष्टी | साने गुरूजी, अंगणातले पाहुणे, आनंदी पक्षी , सागर, रानातली अंगाई, सुबि लालसर,जन्मभूमी |
| ४• | देशप्रेम | साने गुरूजी, भास्कर राय, अप्पा पटवर्धन - एक सेवाभावी जीवन, सहकार महर्षि विखे पाट ल, गांधीजींच्या शब्दात गोखले, विचारधन जन्मभूमी |

सारणी क्रमांक ४·४· ··· पुढे चालू ····

| अ·नं· | मूल्याचे नाव | मूल्यानी प्रतिबिंबीत असणारे पाठ |
|---|---|---|
| ५· | श्रमप्रतिष्ठा | सानेगुरूजी, अप्पा पटवर्धन एक सेवाभावी जीवन, सहकारमहर्षि विखे-पाटील, आम्ही बंगाली शिकलो, आबा, अखंड, |
| ६· | जिव्हाळा | साने गुरूजी, बहिणीची माया, अब्दुलमिया, गांधीजींच्या शब्दांत गोखले, संतवाणी· |
| ७· | निसर्गप्रेम | माझा विरंगुळा, आनंदी पक्षी, सागर, रानातली अंगाई, झुबे लालसर |
| ८· | वात्सल्य | साने गुरूजी, अब्दुलमिया, माझा विरंगुळा, रानातली अंगाई, मो-याची बल्लारी |
| ९· | सत्य | अप्पा पटवर्धन - एक सेवाभावी जीवन, गांधीजींच्या शब्दांत गोखले, सर्व धर्मांची शिकवण सारखीच, अखंड, सत्पुरूष लक्षणे· |
| १०· | कर्तव्यनिष्ठा | भास्कर राय, अप्पा पटवर्धन- एक सेवाभावी जीवन, बहिणीची माया, विचारधन· |
| ११· | वैज्ञानिक दृष्टीकोन | साने गुरूजी, मोहीम फत्ते, नव्या जगाचे नायक आम्ही माणूस माझे नांव· |
| १२· | सहकार्य | भास्कर राय, मोहीम फत्ते, महापूर, सहकारमहर्षि विखे·पाटील· |
| १३· | राष्ट्रीय एकात्मता | साने गुरूजी, सर्व धर्मांची शिकवण सारखीच, विचारधन, जन्मभूमी |

सारणी क्रमांक ४•४ .... पुढे चालू ....

| अ•नं• | मूल्याचे नाव | मूल्यानी प्रतिबिंबीत असणारे पाठ |
|---|---|---|
| १४• | धाडस | भास्कर राय, मोहीम फत्ते, बहिणीची माया, जत्रा• |
| १५• | सेवाभाव | सानेगुरुजी, अप्पा पटवर्धन, एक सेवाभावी जीवन, उभा जन्म लोकसेवेला वाहीन, सहकार महर्षि - विखे•पाटील |
| १६• | चिकाटी | अप्पा पटवर्धन - एक सेवाभावी जीवन, मोहीम फत्ते, सहकार महर्षि विखे•पाटील, आबा |
| १७• | रसिकता | जत्रा, माझा विरंगुळा, मैफल, सागर |
| १८• | मानवता | महापूर, अण्णा एक दीपगृह, सर्वधर्मांची शिकवण सारखीच, मानवानो आता या रे• |
| १९• | संयम | भास्कर राय, आम्ही बंगाली शिकलो, सत्पुरुष लक्षणे, संतवाणी |
| २०• | सामाजिक बांधिलकी | उभाजन्म लोकसेवेला वाहीन, गांधीजींच्या शब्दांत गोखले, विचारधन |
| २१• | भूतदया | अंगणातील पाहुणे, मो-याची बल्लारी, संतवाणी |
| २२• | परोपकार | सहकारमहर्षि विखे•पाटील, गांधीजींच्या शब्दात गोखले, सत्पुरुष लक्षणे• |
| २३• | मातृभाव | महापूर, बहिणीची माया, अखंड |

सारणी क्रमांक ४•४ •••• पुढे चालू •••

| अ•नं• | मूल्याचे नाव | मूल्यानी प्रतिबिंबीत असणारे पाठ |
|---|---|---|
| २४• | ध्येयनिष्ठा | साने गुरूजी, मोहिम फत्ते, अण्णा एक दीपगृह |
| २५• | शिष्टाचार | भास्कर राय, विचारधन |
| २६• | मित्रत्व | अंगणातले पाहुणे, अब्दुलमिया |
| २७• | सत्संग | विचारधन, सत्पुरुष लक्षणे• |
| २८• | साधेपणा | अब्दुलमिया, आबा |
| २९• | प्रेम | महापूर, सर्व धर्मांची शिकवण ‡ सारखीच |
| ३०• | कृतज्ञता | उभा जन्म लोकसेवेला वाहिन, समाधी |

वरील प्रमाणे पाठांची मूल्यानुसार विभागणी केल्या नंतर असे आढळून आले की, आदर, सहानुभूति, सौंदर्यदृष्टी, देशप्रेम, श्रमप्रतिष्ठा, जिव्हाळा, निसर्गप्रेम, वात्सल्य, सत्य, कर्तव्यनिष्ठा, सहकार्य, वैज्ञानिक दृष्टीकोन, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांच्यावाढीसाठी अधिकाधिक पाठींची योजना केलेली आहे• आदर हे मूल्य आठ पाठातून प्रतिबिंबित झाले आहे• सहानुभूति हे मूल्य आठ पाठातून प्रतिबिंबित झाले आहे• सौंदर्यदृष्टी व देशप्रेम ही मूल्ये सात पाठातून प्रतिबिंबित झाली आहेत• श्रमप्रतिष्ठा व जिव्हाळा ही मूल्ये पाच पाठामधून प्रतिबिंबित झाली आहेत•

उभाजन्म लोकसेवेला वाहीन, सहकारमहर्षि विखे•पाटील, अण्णा एक दीपगृह, गांधीजींच्या शब्दीत गोखले, अप्पा पटवर्धन – एक

सेवाभावी जीवन, साने गुरूजी, बहिणीची माया, अंगणातले पाहुणे, विचारधन, मानवानो आता या रे, अब्दुलमिया, आबा, आम्ही अंगाली शिकलो, रानातली अंगाई, सागर, सुबे लालसर इत्यादी निवडक पाठ अधिकाधिक मूल्यानीयुक्त आहेत. हे पाठ विद्यार्थ्यांवर अधिक संस्कार करण्याच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने या पाठांचे अध्यापन करताना शिक्षकाने या पाठांकडे विशेष प्रकारचे ध्यान देणे महत्वाचे आहे.

## ४.४ " बालभारती " इयत्ता ७ वी मराठीच्या पाठयपुस्तकाचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून विश्लेषण :

इयत्ता ७ वी च्या बालभारती मराठीच्या पाठयपुस्तकामध्ये २६ गद्यपाठ व १३ पद्यपाठ आहेत. गद्य व पद्य असे एकूण ३९ पाठ आहेत. या पाठांचे मूल्यांच्या दृष्टीने विश्लेषण केले आहे. प्रत्येक पाठातून कोणकोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात याचा शोध घेतला आहे. त्या मूल्यांचे पुढील प्रमाणे सारणी स्वरूपात वर्गीकरण केलेले आहे.

सारणी क्रमांक ४.५

इयत्ता ७ वी च्या बालभारती पाठयपुस्तकातील पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये |
| --- | --- | --- |
| | गद्य विभाग | |
| १. | आनंदभवन मधले दिवस: | देशाभिमान, उदारता, स्वदेशी, सत्याग्रह |

सारणी क्रमांक ४.५ ... पुढे चालू ...

| पाठ क्रमांक | पाठाचे नांव | पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये |
|---|---|---|
| | | सद्सद्विवेकबुद्धी |
| २. | लळा | जिव्हाळा, भूतदया |
| ३. | हातांची किमया | श्रमप्रतिष्ठा, सहकार्य, जिद्द |
| ४. | सुंदर वनातील वाघाची सभा | भूतदया, शिष्टाचार, दया कल्याणकारी दृष्टी |
| ५. | पक्षी पिंज-यातून उडाला. | देशप्रेम, धाडस, स्वाभिमान |
| ६. | हरितक्रांतीचे प्रणेते | देशप्रेम, सहानुभूति, कष्टाळूवृत्ती, धैर्य, स्वावलंबन. |
| ७. | विसरभोळा गोकुळ | समंजसपणा |
| ८. | बहाद्दर चिमण्या | शौर्य, सहानुभूति, एकात्मता |
| ९. | लेखनाचा श्रीगणेशा | साधेपणा, निर्मळपणा, जिद्द |
| १०. | पाऊलवाटा | सौंदर्यदृष्टी, जिव्हाळा |
| ११. | हृदयाची श्रीमंती | सहानुभूति, त्याग, कर्तव्यनिष्ठा, नि:स्वार्थ |
| १२. | पुस्तकांची दु:खे | सहानुभूति, जबाबदारी, निर्मळपणा |
| १३. | बोलावणं आल्या-शिवाय नाही | स्वाभिमान, प्रामाणिकपणा |

सारणी क्रमांक ४•५ .... पुढे चालू ....

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये |
|---|---|---|
| १४• | वृत्तवैकल्ये | विज्ञान निष्ठा, उदारमतवाद, परोपकार कृतज्ञता, सौंदर्यदृष्टी, सेवाभाव |
| १५• | तुषारांचे वैभव | सौंदर्यदृष्टी, रसिकता, निसर्गप्रेम |
| १६• | रुस्तुम ए हिंद | शौर्य, देशप्रेम, आत्मविश्वास, सत्यवचनी, प्रामाणिकपणा• |
| १७• | मौजे शिरकोली | स्वावलंबन, सहानुभूति, श्रमप्रतिष्ठा |
| १८• | सरोजीनी नायडू | देशप्रेम, सहानुभूति, सौजन्य, सौंदर्यदृष्टी, बुध्दिवैभव, समता, नेतृत्व, धैर्य |
| १९• | अंगणवाडी | सहानुभूति, सेवा, स्वच्छता• |
| २०• | आगळा पाहुणचार | कुटुंबवत्सलता, आदर, जिद्द, कष्टाळू, रसिकता• |
| २१• | जुलेखा | स्वाभिमान, शौर्य, धाडस, जिद्द, दया, स्वामीनिष्ठा, देशप्रेम, सहकार्य |
| २२• | स्नेही | स्नेह, आदर, शिष्टाचार |
| २३• | अशी वाढते भाषा | रसिकता |
| २४• | सहल | सौंदर्यदृष्टी, रसिकता |
| २५• | आभाळाएवढी माया | वत्सलता, मातृप्रेम |
| २६• | विचारधन लोकहितवादी | सत्य, एकात्मता, नेतृत्व, राष्ट्रहित |

सारणी क्रमांक ४.५ ... पुढे चालू ...

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये |
|---|---|---|
| | | समाजहित, निर्मळपणा. |
| | गोपाळ गणेश आगरकर | सुरक्षितता, स्थैर्यता, सामर्जस्य |
| | आचार्य शं. द. जावडेकर | प्रयत्नवादी, बुध्दिप्रमाणता |
| | पद्य विभाग | |
| १. | नवा शिपाई | समता, बंधुभाव, एकता- स्वाभिमान |
| २. | करू जय शोभावंत | उदारता, समता, नि:स्वार्थ, सेवाभाव |
| ३. | बालमित्रास | सौंदर्यदृष्टी, निसर्गप्रेम |
| ४. | मन | मन:शांती |
| ५. | आला आषाढ - श्रावण | सौंदर्यदृष्टी, रसिकता |
| ६. | चंदन | मातृप्रेम, कृतज्ञता, निरपेक्षवृत्ती |
| ७. | हळद उन्हाची | सौंदर्यदृष्टी, रसिकता |
| ८. | खुणा | कल्पकता, रसिकता, सौंदर्यदृष्टी |
| ९. | संथ निळे हे पाणी | आनंदीवृत्ती, सौंदर्यदृष्टी, कल्पकता, रसिकता. |
| १०. | सुतारपक्षी | जिद्द, महत्त्वकांक्षा |

सारणी क्रमांक ४•५ ••• पुढे चालू •••

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | पाठातून प्रतिबिंबित झालेली मूल्ये |
|---|---|---|
| ११• | असेल हिंमतलढणारांची | धाडस, सत्व, जिद्द, श्रमप्रतिष्ठा, सृजनशीलता• |
| १२• | नलराजा आणि हंस | भूतदया, सहानुभूति, दया |
| १३• | संतवाणी | धैर्य, परोपकार |

वरील सारणी क्रमांक ४•५ मध्ये इयत्ता ७ वी च्या पाठयपुस्तकातून ( बालभारती ) कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात याचे पाठाप्रमाणे वर्गीकरण केले आहे• या मूल्यांचे निरीक्षण केले असता असे आढळून येते की, काही मूल्ये भिन्न भिन्न पाठातून प्रतिबिंबित होतात• एकच मूल्य एकाहून अधिक पाठातून प्रतिबिंबित होते असे दिसते• यावरून कोणती मूल्ये वारंवार पाठाच्या माध्यमातून मूलामध्ये संक्रमित करावयाची याची जाणीव शिक्षकांना होते• पुढील सारणी क्रमांक ४•६ मध्ये मूल्यावरून पाठांचे वर्गीकरण केले आहे•

## सारणी क्रमांक ४•६

### मूल्यावर आधारित केलेले पाठांचे वर्गीकरण

| अ•नं• | मूल्याचे नांव | मूल्यानी प्रतिबिंबित असणारे पाठ |
|---|---|---|
| १• | सौंदर्यदृष्टी | पाऊलवाटा, व्रतवैकल्ये, तुषारांचे वैभव, |

सारणी क्रमांक ४·६ ... पुढे चालू ...

| अ·नं· | मूल्याचे नांव | मूल्यानी प्रतिबिंबित असणारे पाठ |
| --- | --- | --- |
| | | सरोजिनी नायडू, सहल, बालमित्रास, आला आषाढ-श्रावण, हळद उन्हाची, खुणा, सांध निळे हे पाणी· |
| २· | जिद्द | हातांची किमया, बहादूर चिमण्या, लेखनाचा श्रीगणेशा, रुस्तुम-ए-हिंद, आगळा पाहुणचार, जुलेखा, चंदन, सुतारपक्षी, असेल हिंमत लढणारांची |
| ३· | सहानुभूति | हरितक्रांतीचे प्रणेते, बहादूर चिमण्या, हृदयाची श्रीमंती, पुस्तकांची दु:खे, मौजे शिरकोली, सरोजिनी नायडू, अंगणवाडी, नलराजा आणि हंस· |
| ४· | रसिकता | तुषारांचे वैभव, आगळा पाहुणचार अशी वाढते भाषा, सहल,आला आषाढ श्रावण, हळद उन्हाची, खुणा, सांध निळे हे पाणी |
| ५· | स्वाभिमान | पक्षी पिंज-यातून उडाला, बोलावणं आल्याशिवाय नाही, आगळा पाहुणचार, जुलेखा, नवा शिपाई, असेल हिंमत लढणारांची· |
| ६· | निसर्गप्रेम | पाऊलवाटा, तुषारांचे वैभव, सहल, आला आषाढ श्रावण, खुणा, सांध निळे हे पाणी |
| ७· | देशप्रेम | पक्षी पिंज-यातून उडाला, हरितक्रांतीचे प्रणेते, रुस्तुम ए हिंद, सरोजिनी नायडू, जुलेखा· |

सारणी क्रमांक ४•६ .... पुढे चालू ...

| अ•नं• | मूल्याचे नाव | मूल्यानी प्रतिबिंबित असणारे पाठ |
|---|---|---|
| ८• | कल्पकता | हातांची किमया, आला आषाढ- श्रावण, खुणा, सांग निळे हे पाणी, सुतारपक्षी |
| ९• | धाडस | पक्षी पिंज-यातून उडाला, जुलेखा, हरितक्रांतीचे प्रणेते, नवा शिपाई, असेल हिंमत लढणारांची |
| १०• | त्याग | हरितक्रांतीचे प्रणेते, पुस्तकांची दु:खे, करु जग शोभावंत, असेल हिंमत लढणारांची• |
| ११• | स्वावलंबन | हातांची किमया, हरितक्रांतीचे प्रणेते, मौजे शिरकोली, विचारधन |
| १२• | शिष्टाचार | आनंदभवन मधले दिवस, सुंदरबनातील वाघांची सभा, आगळा पाहुणचार, स्नेही• |
| १३• | कष्टाळू | हरितक्रांतीचे प्रणेते, आगळा पाहुणचार, अंगणवाडी, सुतारपक्षी |
| १४• | आदर | आनंदभवन मधले दिवस, आगळा पाहुणचार, स्नेही, विचारधन |
| १५• | उदारता | आनंदभवन मधले दिवस, व्रतवैकल्ये, करु जग शोभावंत, मन |
| १६• | शौर्य | बहादूर चिमण्या, रुस्तुम-ए-हिंद, जुलेखा |
| १७• | आनंदीवृत्ती | तुषारांचे वैभव, अंगणवाडी, सांग निळे हे पाणी |

सारणी क्रमांक ४.६ .... पुढे चालू ...

| अ.नं. | मूल्याचे नाव | मूल्यानी प्रतिबिंबित असणारे पाठ |
|---|---|---|
| १८. | धैर्य | हरितक्रांतीचे प्रणेते, सरोजिनी नायडू, संतवाणी, |
| १९. | नि:स्वार्थ | हृदयाची श्रीमंती, विचारधन, करु जग शोभावंत |
| २०. | परोपकार | हृदयाची श्रीमंती, व्रतवैकल्ये, चंदन |
| २१. | समंजसपणा | विसरभोळा गोपाळ, सरोजिनी नायडू, विचारधन |
| २२. | भूतदया | सुंदरबनातील वाघांची सभा, सहल, नलराजा आणि हंस |
| २३. | दया | सुंदरबनातील वाघांची सभा, जुलेखा, नलराजा आणि हंस. |
| २४. | सेवाभाव | लळा, व्रतवैकल्ये, अंगणवाडी |
| २५. | सहकार्य | हातांची किमया, जुलेखा |
| २६. | सद्सद् विवेक बुध्दी | आनंदभवन मधले दिवस, सुंदर बनातील वाघांची सभा |
| २७. | मातृप्रेम | आभाळा एवढी माया, चंदन |
| २८. | समय सूचकता | पक्षी पिंजऱ्यातून उडाला, नौजे शिरकोली. |

सारणी क्रमांक ४.६ मध्ये इयत्ता ७ वी च्या " बालभारती " पुस्तकातील प्रत्येक पाठामधून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचा शोध घेऊन

त्याचे विश्लेषण केले आहे. या विश्लेषणामध्ये असे आढळून आले आहे की, सौंदर्यदृष्टी, जिद्द, सहानुभूति, रसिकता, स्वाभिमान, निसर्ग प्रेम, देशप्रेम, कल्पकता, धाडस, त्याग, स्वावलंबन, शिष्टाचार, कष्टाळू, आदर, उदारता इत्यादी मूल्ये पाठामधून वरचेवर आलेली आहेत. त्यामुळे हे संस्कार मुलांवर करणे आवश्यक आहेत.

हातांची किमया, तुषारांचे वैभव, वृत्तवैकल्ये, सहल, सरोजिनी नायडू, बहाद्दर चिमण्या, लेखनाचा श्रीगणेशा, रुस्तुम-ए-हिंद, आगळा पाहुणचार, जुलेखा, पक्षी पिंज-यातून उडाला, आनंदभवनमधले दिवस, सुंदरबनातील वाघांची सभा, विचारधन, नवा शिपाई, करू जग शोभावंत, चंदन, स्थिर निळे हे पाणी, असेल हिंमत लढणारांची आणि नलराजा आणि हंस हे पाठ मूल्यगर्भ आहेत. या पाठांमधून तीन पेक्षा अधिक मूल्ये प्रतिबिंबित झालेली आहेत.

इयत्ता ५ वी ते ७ वी च्या "बालभारती" मराठीच्या पाठय पुस्तकामध्ये कोणकोणत्या मूल्यांचे गद्य-पद्य पाठ आहेत. तसेच मूल्यानुसार पाठाचे वर्गीकरण केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कोण कोणती मूल्ये रूजविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. याचे सम्यक चित्र उभे राहते.

मूल्यांना सामाजिक संदर्भ असतो. एखादे वर्तन चांगले की, वाईट हे जो तो समाज ठरवित असतो. त्यामुळे मूल्यांचे वैयक्तिक मूल्ये, सामाजिक मुल्ये, नैतिक मूल्ये, आध्यात्मिक मूल्ये, सांस्कृतिक मूल्ये असे वेगवेगळे प्रकार मानता येत नाहीत. त्यामुळे पाठातील मूल्यांचे विश्लेषण करताना मूल्ये कोणत्याही प्रकारामध्ये मोडलेली नाहीत. पाठातील व्यक्ती-प्रसंग, घटनेतून जे वातावरण निर्माण होईल त्यामधून मूल्ये संक्रमित करण्यात येतील असे वाटते.

## ४.५ समारोप :

या प्रकरणामध्ये इयत्ता ५ वी ते ७ वी च्या " बालभारती " या पाठयपुस्तकातील पाठांचे मूल्यांच्या दृष्टीने विश्लेषण केले आहे. पाठामधून कोण कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात, त्या मूल्यांच्या संदर्भात चर्चा करून मूल्यानुसार पाठांचे वर्गीकरण केलेले आहे. पुढील प्रकरणामध्ये प्रश्नावली, मुलाखती, व निरीक्षणाद्वारे गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करून या विश्लेषणावर आधारित अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे.

=0=0=0=0=0=

संदर्भ :

(१) इयत्ता १ ली ते ७ वी च्या सुधारित अभ्यासक्रमाचा पुनर्रचित मसूदा म•रा•शै•संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे १९७८ पृष्ठ ४३

(२) म•बा•कुंडले : शैक्षणिक तत्वज्ञान व समाजशास्त्र, पुणे श्री विद्या प्रकाशन, १९७४•

(३) Radhakrishnan ( Chairman) Report of the University Education 1948, New Delhi : Ministry of Education, 1962.

(४) Madaliyar (Chairman), Report of the secondary Education Commission, 1952.53 New Delhi. Ministry of Education.

(५) दि•ह•सहस्त्रबुद्धे : शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन पुणे : साधना प्रकाशन, १९८५ पृष्ठ ४८

(६) Kothari D.S. (Chairman) Report of the Education commission (1964.66) Eduction and National Development. page 7, New Delhi : N.C.E.R.T. Reprint 1971.

(७) Goyal B.R. Documents on Social, Moral and Spiritual Values in Education, New Delhi N.C.E.R.T. 1979.

=0=0=0=0=0=